# कवितेचा गाव

भाग-२



## जुन्या शालेय पुस्तकातील मुलांची गाणी

# कवितांचा गाव

## भाग- २

जुन्या शालेय पुस्तकातील मुलांची गाणी

संकलन व संपादन :

**गुरुदास**

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती

- संकलन व संपादन : गुरुदास

- प्रकाशक : हेमंत स. साटम

- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंड. इस्टेट, लालबाग,
  मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

# अनुक्रम :


| | | |
|---|---|---|
| | दोन शब्द | ५ |
| १. | ताई गुणाची | ८ |
| २. | गोरी गोरीपान, फुलासारखी छान | ९ |
| ३. | तुझ्या गळा, माझ्या गळा | १० |
| ४. | आनंदी आनंद गडे ! | १२ |
| ५. | आई, बघ ना कसा हा दादा ? | १४ |
| ६. | छोटा सरकसवाला | १५ |
| ७. | पाखरांची शाळा | १७ |
| ८. | उंटाची तक्रार | १८ |
| ९. | रानपाखरा ! | १९ |
| १०. | खुळा पाऊस | २१ |
| ११. | प्रभात | २२ |
| १२. | झुळुक मी व्हावे | २४ |
| १३. | शाळेचा रस्ता | २५ |
| १४. | चिमणा वासुदेव | २७ |
| १५. | पाखरे बघ गेली कोटरी | २८ |
| १६. | पावसाचे गाणे | ३० |
| १७. | पाऊस | ३२ |
| १८. | भाताचे रोप | ३४ |
| १९. | फुलपाखरे | ३६ |

२०. लेझीम ........................................ ३८
२१. मुलांचा स्वर्ग ................................ ४०
२२. श्रावणमास ..................................... ४२
२३. पाळणा ........................................ ४२
२४. अंगाई गीत .................................... ४४
२५. ते डोंगर सुंदर ................................. ४५
२६. घे कुठार ! ..................................... ४६
२७. छडी लागे छम् छम् ! ......................... ४७
२८. भारती सृष्टीचे सौंदर्य खेळे ................... ४८
२९. रे हिंद बांधवा ! ................................. ४९
३०. कोंबडा ........................................ ५१
३१. सृष्टीचे चमत्कार ............................. ५३
३२. मुलास उपदेश ................................. ५४
३३. बालवीराची शपथ ............................ ५६
३४. बलसागर भारत होवो ......................... ५९
३५. मंगलदेशा, पवित्रदेशा ! ...................... ६१
३६. पसायदान .................................... ६२

# दोन शब्द !

**बालमित्रांनो,**

'कवितांचा गाव'च्या पहिल्या भागात साठ-पासष्ठ वर्षापूर्वीच्या शालेय पुस्तकातील लहान मुलांच्या कवितांचा समावेश केला आहे. या कविता निवडक आहेत आणि साध्या सोप्या आहेत. त्या पाठ करणंही फारसं कठिण नाही.

आता 'कवितांचा गाव'च्या या दुसऱ्या भागात आणखी काही निवडक कवितांचा समावेश केला आहे. दोन्ही भागात मिळून ८० कविता या उपक्रमातून तुम्हा मुलांसाठी संकलित केल्या आहेत. प्रत्यक्षात मात्र जुन्या शालेय पुस्तकातील कवितांची संख्या अफाट आहे. गेल्या पन्नास-साठ वर्षात लहान मुलांसाठी अनेक नामवंत कवींनी अगणित कविता लिहून कवितेचा हा प्रांत अतिशय संपन्न केला आहे. बाल साहित्यातील कवितांचा हा प्रदेश खरं म्हणाल तर कवितांच्या गावातील एक सवता सुभाच आहे. कवितांच्या गावात असे अनेक सवते सुभे आहेत. संत कवींच्या कवितांचा एक सुभा. मोरोपंत, वामन पंडित आदि पंडित कवींचा वेगळा सुभा. रामजोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा आदि तंत कवींचा वेगळा सुभा आणि परंपरागत लोकगीतांचा एक स्वतंत्र

सुभा. केशवसुतांपासून सुरु झालेल्या आधुनिक कवितांचा प्रांत तर खूप विस्तीर्ण आहे. त्यामुळेच मराठी कवितांचा गाव हे एक साम्राज्य झाले आहे. कवितांच्या या साम्राज्याची गावकूस अगदी आगळी-वेगळी आहे.

या साम्राज्यात जिकडे-तिकडे कवितांचीच जगरहाटी आहे. कवितांचीच शेतं, कवितांची कुरणं, कवितांचीच वृक्ष आणि वनराई, कवितांची फुलं, कवितांचेच आकाश. येथील नद्यांमधूनही निरंतरपणे कविताच वाहते. कवितांचा हा गाव म्हणजे एकप्रकारे पृथ्वीवरचे नंदनवनच आहे. हवं तर त्याला स्वर्ग म्हणा. कारण येथे आनंदाशिवाय काही उगवत नाही आणि आनंदाशिवाय दुसरं काही पिकत नाही.

एकदा का कवितेची ओळख होऊन तिच्याशी नाळ जुळली गेली की, मग कविताच आपल्याला बोट धरुन या नंदनवनात फिरवते. लहान मूल होऊन मग या स्वर्गात आपण न कंटाळता, अथकपणे मुशाफिरी करु लागतो. मग तहान-भूक हारपून जाते.

या कवितांच्या साम्राज्यात जाण्यासाठी कुणाची परवानगी नको. पैसे देऊन तिकीट काढण्याचीही गरज नाही. वाहन नको, सामानसुमान नको. कोणतेही सायास नकोत.

मनात यायचा अवकाश आपण दुसऱ्या क्षणी कवितांच्या जगात पाऊल टाकतो. तेथील प्रवास, तेथील निवास, तेथील कवितांचा सहवास म्हणजे केवळ आनंद.

'कवितांचा गाव' या संकलनामागे एकच हेतू आहे आणि तो म्हणजे तुम्हा लहान मुलांना कवितांची तोंड ओळख करुन देणे. तो साध्य होईल अशी अपेक्षा आहे. आता ही ओळख कायम ठेवून, ती अधिक घट्ट करीत कवितांचं बोट धरुन कवितांच्या गावात हवं तेव्हा मनमुराद हिंडा आणि आनंदाचे मळे पिकवा. येथील आनंद हा निर्मळ आनंद आहे. जगरहाटीतल्या सुख-दु:खांचा, द्वेष-मत्सराचा, वेदना-विषण्णतेचा त्यास इतुकासाही स्पर्श नाही. उलट या सर्व भावनांना या आनंदाचा जरासाही वारा लागला तरी मग दु:ख, वेदना, विषण्णता नकोशी वाटत नाही. तिच्याशीही जिव्हाळा वाटू लागतो.

'कवितांचा गाव' या कवितांच्या संकलनातून तुमच्या मनात सगुण-निर्गुण जगाबद्दल असाच भाव दाटून येवो व तो दृढ होत जावो हीच प्रांजळ इच्छा!

**- गुरुदास**